**प्रेस नोट**

विषय :- दिव्यांगजन सशक्तीकरण राष्ट्रीय पुरस्कार, २०२६ चे अर्ज / नामांकन सादर करणे व व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत.

दिव्यांग व्यक्तींशी संबंधित समस्यांकडे लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास प्रोत्साहन देण्यासाठी 'दिव्यांगजन सशक्तीकरण राष्ट्रीय पुरस्कार' सुरू करण्यात आले आहे. हे पुरस्कार दरवर्षी ३ डिसेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिना' निमित्त दिव्यांग व्यक्तीच्या सशक्तीकरणासाठी कार्यरत असणाऱ्या उत्कृष्ट दिव्यांग व्यक्ती, इतर व्यक्ती आणि संस्थांना प्रदान केले जातात. या राष्ट्रीय पुरस्कारांची मार्गदर्शक तत्त्वे (Guidelines) विभागाच्या संकेतस्थळावर (www.depwd.gov.in) तसेच राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर (www.awards.gov.in) उपलब्ध आहेत. या पुरस्कारासाठीचे अर्ज/नामांकने केवळ 'राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल'वर (www.awards.gov.in) ऑनलाइन माध्यमातूनच मागवण्यात आले आहेत. ऑनलाइन नामांकने/अर्ज भरणे १५ मे, २०२६ पासून सुरू झाले असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै, २०२६ आहे.

---

जा.क्र. स.आ.दि.स.कार्या/ प्रसिध्दी प्रत्रक/४०२ /26
कार्यालय :- जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय
जिल्हा परिषद गडचिरोली
दिनांक 24/07/2026

प्रति,

मा. जिल्हा माहिती अधिकारी
गडचिरोली

वरील बातमी लोकप्रीय दैनिकांमध्ये प्रकाशित करुन व्यापक प्रसिध्दीस सहकार्य करावे हि विनंती.

सहाय्यक आयुक्त
दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय
जिल्हा परिषद गडचिरोली